शैक्षणिक संदर्भ अंक १३६ जून-जुलै २०२२

महा इतिहास - भाग १८

# कृषिप्रधान समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

# कृषिप्रधान समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*जगाच्या वेगवेगळ्या भागातील मानवसमूह हे शेती व पशुपालनाकडून शहरीकरण व शासनव्यवस्थांकडे कसे गेले हे आपण मागील दोन लेखांत पाहिले आहे. यातून जगात एक व्यापक असे कृषिप्रधान समाजव्यवस्थांचे जाळे प्रस्थापित झाले. भटक्या टोळ्यांपासून गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेकडे झालेल्या या सांस्कृतिक संक्रमणातूनच आजच्या आधुनिक मानवी समाजव्यवस्थेचा पाया घातला गेला. कृषिप्रधान समाजव्यवस्थेतील काही बारकाव्यांचा या लेखात थोडक्यात आढावा घेऊया.*

कृषिप्रधान समाजव्यवस्थेचे जे ढोबळ चित्र आपण आत्तापर्यंत पाहिले आहे त्याचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे होते.

- **शेती व पशुपालन** - या समाजव्यवस्थेचा पाया होता शेती व पशुपालन करणारे खेडूत लोक. शेती व पशुपालनाचे तंत्रज्ञान वापरून विविध प्रकारच्या मानवोपयोगी संसाधनांची निर्मिती करण्याचे कौशल्य असलेल्या या लोकांच्या जिवावरच या समाजव्यवस्थेचा डोलारा उभा राहिला.
- **शहरे** – खेड्यांच्या तुलनेने अधिक दाट वस्ती असलेल्या रचना आणि अधिक वैविध्यपूर्ण कौशल्ये असलेल्या आणि वैविध्यपूर्ण कामे करणाऱ्या लोकांची वस्ती म्हणजे शहरे. ग्रामीण भागातून संपत्ती आणि संसाधनांचा ओघ शहरांकडे येत होता. शहरांमध्ये ही सारी संपत्ती एकवटत होती.

- **शासनव्यवस्था** – शहरांमध्ये सत्ताही एकवटलेली होती. स्थानिक शासक शहरांमध्ये सर्वाधिक वेळ रहात असत. शासनव्यवस्थेची प्रतीके असलेल्या उंच उंच तटबंद्या आणि सुंदर स्थापत्याचे प्रदर्शन करणारी देवालये आणि राजवाडेही शहरांमध्येच होते. आपापल्या शहरांमधून हे शासक आजूबाजूच्या परिसरावर अक्षरशः दादागिरी करत होते आणि यातूनच बळजबरीने नजराण्यांची वसुली करणारी शासनव्यवस्था उभी राहिली होती.



*कृषिप्रधान समाजव्यवस्थेचे पहिले प्रारूप असलेल्या सुमेरमधील उर प्रांतातील पहिल्या राजघराण्याच्या थडग्यामध्ये सापडलेल्या एका लाकडी पेटीच्या ह्या दोन बाजू आहेत. डावीकडील चित्रातील बाजूवर शांतता असतानाचे समाजजीवन दाखवलेले आहे तर उजवीकडच्या चित्रातील बाजूवर युध्दकालीन समाजजीवन दाखवलेले आहे. दोन्ही चित्रे अतिशय सुंदर मीनाकामातून साकारलेली आहेत. (स्रोत – विकीपिडिया)*

- **कामाची विभागणी व विशिष्ट कौशल्यांमध्ये पारंगतता** – भटक्या व शिकारी लोकांच्या तुलनेत या समाजव्यवस्थेत कितीतरी वेगवेगळया प्रकारची कामे लोक करत होते आणि विविध प्रकारच्या भूमिका बजावत होते. सर्वांना सगळी कामे करता येण्याची गरज नव्हती. विशिष्ट कौशल्य कमावून विशिष्ट कामात मक्तेदारी प्रस्थापित केली जात होती. कामांच्या विविधतेतूनच विचारांची विविधताही उगम पावली. सामूहिक ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया मानवी समाजाच्या वेगळया वाटचालीसाठी कारणीभूत आहे. या प्रक्रियेला या समाजव्यवस्थेत प्रचंड चालना मिळाली.

- **सैन्य** – सत्ता व संपत्ती मूठभर शासकांच्या हाती एकवटल्यावर संरक्षणही आवश्यक बनले. शिस्तबध्द योद्ध्यांची सैन्यदले जशी शेजाऱ्यांबरोबर लढाया करण्यासाठी उपयुक्त होती तशीच अंतर्गत विरोधकांच्या दमनासाठीही वापरता येत होती.
- **लेखन** – यातील प्रत्येक संस्कृतीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात लेखनाची कला विकसित झाली. लेखनाद्वारे हिशेब ठेवता येणे हे संसाधनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक होते. त्याचबरोबर लेखनाद्वारे कायदे व धार्मिक आज्ञांची नोंद व प्रचार करून विचारांवर नियंत्रण ठेवणेही शक्य झाले.
- **नजराणे** – उत्पादक खेड्यांकडून सत्ताकेंद्रे असलेल्या शहरांकडे संपत्तीचा ओघ हा मुख्यतः दडपशाहीमुळे नाईलाजाने सत्ताधीशांना द्याव्या लागणाऱ्या नजराण्यांच्या स्वरूपात येत होता. व्यापारापेक्षा हा संसाधनांचा प्रवाह वेगळा होता. व्यापारात संसाधनांची व संपत्तीची देवाणघेवाण होते. इथे सत्ताधीशाला नागरीक नजराणे सादर करत होते पण त्याबदल्यात त्यांना फारसे काहीच मिळत नव्हते. माणसे हाही या संसाधनांच्या प्रवाहाचा भाग होती व यातूनच गुलामीची संकल्पना निर्माण झाली. समाजात असलेली ही सत्तेची व अधिकारांची उतरंड कुंटुबांच्या पातळीवरही प्रतिबिंबित झाली व पितृसत्ताक कुटुंबपध्दतींचा उदय झाला.

आपल्या प्रजातीची (होमो सेपियन) उत्क्रांती साधारण अडीच लाख वर्षांपूर्वी झाली. शेवटचे हिमयुग संपेपर्यंत – म्हणजे साधारण १२,००० वर्षांपूर्वीपर्यंत – आपण इतर अनेक समूहप्रिय प्राण्यांप्रमाणे भटके जीवन जगत होतो. हिमयुग सरल्यावर बदललेल्या भौगोलिक परिस्थितीशी त्यावेळी पृथ्वीतलावर असलेल्या सर्वच सजीवांना जुळवून घ्यावे लागले. माणसांनी आपल्या बुध्दीचा व सामूहिक ज्ञाननिर्मितीचा वापर करून इतर

प्राण्यांपेक्षा वेगळा मार्ग अवलंबला आणि जगाच्या खूप मोठ्या भागात शेती व पशुपालनावर आधारित एका जागी स्थिरावलेल्या समूहांची गुंतागुंतीची समाजव्यवस्था निर्माण झाली.

साधारण ५,००० वर्षांपूर्वी जगातील एकूण जमिनीच्या (महासागरांचा भाग वगळून) फक्त २ टक्के क्षेत्रफळावर – मेसोपोटेमिया व इजिप्त इथे – शेती व पशुपालनावर आधारित शहरी संस्कृती वसलेल्या होत्या. पुढच्या केवळ २,००० वर्षांमध्ये अशा कृषिप्रधान संस्कृतींची व्याप्ती पृथ्वीच्या (जमीन व महासागर मिळून) एकूण क्षेत्रफळाच्या २ टक्के इतकी मोठी झालेली होती. त्यानंतरच्या साधारण २,००० वर्षांमध्ये ह्या संस्कृतींनी जगाचे १३ टक्के क्षेत्रफळ व्यापले.

५,००० वर्षांपूर्वी संपूर्ण जगाची लोकसंख्या साधारण ५ कोटीच्या आसपास असावी. २,००० वर्षांपूर्वी ही संख्या साधारण २५ कोटी झाली होती व त्यापैकी जवळजवळ निम्मे लोक कृषिप्रधान समाजव्यवस्थेत रहात होते. शेती व पशुपालनाचा अंगीकार करून स्थिरावल्यानंतर अतिशय कमी कालावधीत हे प्रचंड मोठे सांस्कृतिक व सामाजिक संक्रमण झाले हे या समाजव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

मानवाच्या काहीशा वेगळ्या मार्गाने झालेल्या जैविक उत्क्रांतीतच ह्या संक्रमणाचा उगम असल्याने जैविक उत्क्रांतीच्या साखळीतलीच ही पुढची पावले होती असेही याकडे पहाता येईल. पृथ्वीवर जीवसृष्टीची उत्पत्ती झाल्यापासून उत्क्रांतीच्या प्रक्रियेद्वारे लक्षणीय बदल होण्यासाठी लक्षावधी-कोट्यवधी वर्षे लागत होती – गुणसूत्रांमधील बदलांद्वारे उत्क्रांती होण्यासाठी अजूनही तसाच कालावधी लागतो. पण मानवांच्या समाज म्हणून होणाऱ्या उत्क्रांतीने मात्र साधारण ५,००० वर्षांपूर्वी अचानक प्रचंड वेग पकडला. यात

माणसांनी आपल्या उत्क्रांत मेंदूचा वापर करून विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचाही मोठा वाटा आहे. या तंत्रांचा वापर करून माणसे आपल्या स्वतःच्या जैविक मर्यादांवर तसेच निसर्गातून आपल्या मार्गात उभ्या रहाणाऱ्या आव्हानांवर मात करू शकली. एका अर्थाने पाहिले तर तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण आपल्या सामाजिक उत्क्रांतीचे सुकाणू आपल्या स्वतःच्या हातात घेतले. पुढे जाऊन वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण जैविक उत्क्रांतीवरही काही अंशी नियंत्रण मिळवले आहे. अर्थात या अतिवेगाने झालेल्या संक्रमणातून काही वेगळ्या समस्याही उभ्या रहात आहेत आणि याचाही ऊहापोह आपण पुढे करूच. माणसांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाकडे मानवी जैविक उत्क्रांतीचा पुढचा अध्याय म्हणून पहाण्याचा दृष्टिकोन महा इतिहास आपल्याला देतो, इतकेच इथे नमूद करायचे आहे.


साधारण ५,००० वर्षांपूर्वीपासून ते १४व्या शतकात मानवी समाजव्यवस्थेतील संक्रमणाची पुढची पायरी गाठेपर्यंतचा कालावधी हा कृषिप्रधान संस्कृतींचा टप्पा मानला जातो. कृषिप्रधान संस्कृतींचा हा प्रवास अनेक चढउतारांनी आणि संघर्षांनी भरलेला होता. प्रत्येक राजेशाहीला अंतर्गत विरोधक आणि बाहेरून होणारे हल्ले अशा दोन पातळ्यांवर लढावे लागणे साहजिकच होते. त्यामुळे या प्रत्येक संस्कृतीमध्ये एखाद्या सत्ताधीश घराण्याच्या अधिपत्याखाली काही शतके शांततेची व वैभवाची तर मधेच काही शतके अशांतता व अनिश्चिततेची गेलेली दिसतात. या साऱ्या कालावधीत समूहांची स्थलांतरेही चालूच होती आणि स्थलांतरीत लोकांबरोबर स्थानिकांचे मुख्यतः जमिनीच्या मालकीवरूनचे संघर्ष हाही या साऱ्या चढउतारांचा एक महत्त्वाचा भाग होता. परस्परांबरोबरच्या संघर्षांबरोबरच बदलते हवामान व नैसर्गिक परिसंस्थांमधील बदल हेही

या संक्रमणाला हातभार लावणारे महत्त्वाचे घटक होते. पण या सगळ्यांवर मात करत प्रत्येक भागात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात कृषी व पशुपालन, त्यावर आधारित शहरीकरण व शहरांमध्ये केंद्रित झालेली शासनव्यवस्था, या स्वरूपाची रचना मात्र कायम राहिली, विकसित व विस्तारित होत गेली, आणि शेती व पशुपालनातून मिळणारे उत्पन्न वाढवण्यासाठी नव्या नव्या तंत्रांची निर्मिती करण्याची प्रेरणाही देत राहिली. या प्रत्येक राज्याच्या सीमा धूसर व सतत बदलत्या होत्या. काही शक्तिशाली राज्यांनी आपल्या सीमेजवळील इतर लहान राज्ये कवेत घेत स्वतःचा विस्तारही वाढवत नेला व त्यांची साम्राज्ये झाली.

समकालीन संस्कृतींमधील व्यापारउदीम आणि ज्ञान व माहितीची देवाणघेवाण हेही या संपूर्ण कालावधीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. यामुळे सामूहिक ज्ञाननिर्मितीला अधिकच चालना मिळाली. आफ्रिका, आशिया व युरोप खंडातील (आफ्रो-युरेशिया) सर्व संस्कृती एकमेकांशी व्यापारी मार्गांनी जोडल्या गेलेल्या होत्या. अशीच काहीशी जोडणी अमेरिका खंडातील संस्कृतींमध्येही प्रस्थापित झाली. पॅसिफिक बेटांवरील मानवी समूह तसेच ऑस्ट्रेलियाच्या विविध भागांत रहाणारे मानवी समूह यांमध्ये जरी कृषिप्रधान संस्कृती उभ्या राहिल्या नसल्या तरी व्यापारी व वैचारिक देवाणघेवाणीचे नाते मात्र प्रस्थापित झालेले होते. पण विशेषतः आफ्रो-युरेशियातील सामूहिक ज्ञाननिर्मितीतून जागतिक मानवी समाजाच्या इतिहासातील पुढच्या महत्त्वाच्या संक्रमणाचा पाया घातला गेला.

यापैकी सर्वात महत्त्वाचे संपर्क जाळे म्हणजे रेशीम रस्ते किंवा सिल्क रोड्स हे खुष्कीच्या मार्गाने चालणाऱ्या व्यापारासाठी तयार झालेले रस्त्यांचे जाळे होते. त्याखेरीज

भारतीय उपखंडाच्या दोन्ही किनारपट्ट्यांवरून आफ्रो-युरेशियातील इतर किनाऱ्यांना जोडणारे सागरी व्यापारी मार्गांचेही एक जाळे उभे राहिले.




*पहिल्या शतकापर्यंत आफ्रो-युरेशियात प्रस्थापित झालेले जमिनीवरील व सागरी व्यापारी मार्गांचे जाळे (स्रोत – विकीपिडिया)*

साधारण ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकापर्यंत आफ्रो-युरेशियामध्ये चार मोठी साम्राज्ये स्थापन होऊन या विशाल बहुखंडीय भूभागावर बऱ्यापैकी स्थैर्य निर्माण झालेले होते. ही चार साम्राज्ये म्हणजे – रोमन, पार्थियन, कुशाण आणि हान. प्रत्येक साम्राज्यात चांगले रस्त्यांचे जाळे निर्माण झाले, दळणवळणाच्या यंत्रणा उभ्या राहू लागल्या, नवनव्या तंत्रांच्या मदतीने शेती व पशुपालनाची उत्पादकता वाढली, आणि जगात प्रथमच चलनी नाण्यांचा वापर सुरू झाला. या संपूर्ण परिसरात जनावरांचे कळप घेऊन भटकणाऱ्या गुराखी व धनगरांचे गटही फिरत होते. माहिती व ज्ञानाच्या देवाणघेवाणीत आणि सांस्कृतिक अभिसरणात त्यांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

या व्यापारी मार्गांच्या जाळ्याच्या केंद्रस्थानी होते कुशाण साम्राज्य. सध्याचा अफगाणिस्तान व पाकिस्तान आणि उत्तर भारताचा काही भाग अशी या साम्राज्याची मोठी व्याप्ती होती. कुशाण राज्यकर्त्यांनी आफ्रो-युरेशियातील इतर सर्व साम्राज्यांशी तसेच भटक्या पशुपालकांच्या टोळ्यांबरोबरही मैत्रीचे संबंध प्रस्थापित केलेले होते.

कुशाण राज्यकर्ते केवळ उत्तम प्रशासकच नव्हते तर त्यांना कलांमध्येही रस होता. त्यांच्या राजाश्रयातील शिल्पकलेचे नमुने पाहिले तर त्यात विविध संस्कृतींच्या कला परंपरांचे विहंगम एकत्रीकरण झालेले दिसते. मानवांच्या सामूहिक ज्ञाननिर्मितीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणायला हवे.



*कुशाण शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले उभ्या बुध्दाचे शिल्प. अंदाजे पहिल्या शतकात निर्मिती झालेले हे शिल्प टोकियो येथील वस्तू संग्रहालयात आहे. (स्रोत – विकीपिडिया)*

कृषिप्रधान समाजव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अतिशय गुंतागुंतीची सामाजिक रचना. झपाट्याने होत असलेले शहरीकरण, वाढत चालेली लोकसंख्येची घनता तसेच विविध प्रकारचे परस्परावलंबित्व या साऱ्यांचा परिपाक म्हणून व्यक्तींचे व समूहांचे एकमेकांबरोबरचे वर्तनही बदलत गेले. वेगवेगळ्या निकषांवरून सामाजिक उतरंडी तयार झाल्या. संपत्ती हा तर एक महत्त्वाचा निकष होताच, पण वेगवेगळ्या व्यवसायांच्या परस्पर तुलनेत महत्वाबाबतच्या धारणा, वांशिक नातेसंबंध, लिंग, अशा साऱ्या गोष्टीही व्यक्तीचे सामाजिक उतरंडीतले स्थान ठरवू लागल्या. पहिले शहरीकरण व पहिली शासनव्यवस्था

बनलेल्या सुमेरमध्ये जशा प्रकारची सामाजिक उतरंड तयार झाली तीच प्रक्रिया इतर संस्कृतींमध्येही झालेली दिसते. प्रत्येकच संस्कृतीत वेगवेगळ्या मार्गांनी एक अजिबात लवचिकता नसलेली आणि पुरुषसत्ताक अशी सामाजिक उतरंड तयार झाली. प्रत्येक संस्कृतीत याचे बारकावे वेगवेगळे होते. उदा. भारतात वर्ण व जातींवर आधारित उतरंड आहे. अशी रचना इतर कोणत्याच संस्कृतीत दिसत नाही. याच समाजात प्रत्येक जातीच्या अंतर्गत पुरुष स्त्रियांपेक्षा वरच्या पायरीवर होते. विवाहापूर्वी वडिलांच्या घरात रहाणारी महिला विवाहानंतर सासरा व नवरा यांच्या घरात जाऊन राहू लागली. कुटुंबात जन्मलेली मुले ही वडिलांची संपत्ती मानली जात, आईचा त्यांच्यावर काहीच हक्क नसे. महिला कोणत्याही प्रकारचे धार्मिक पौरोहित्य करू शकत नव्हत्या व त्यांना जन्मलेल्या कुटुंबातील किंवा विवाह करून गेलेल्या कुटुंबातीलही संपत्तीत वाटा मिळत नसे. कोणत्या ना कोणत्या पुरुषाचे 'संरक्षण' (बाप, भाऊ, सासरा, नवरा व या साऱ्यांनंतर मुलगा) महिलेला असणे आवश्यक मानले जात होते. कमी-अधिक स्वरूपात या पितृसत्ताक धारणा अजूनही भारतीय समाजात तग धरून आहेत.

या लेखात आपण मुख्यतः आफ्रो-युरेशियन समाजव्यवस्थेचा आढावा घेतला. पण या कालावधीत अमेरिका खंड तसेच आशियाचा पूर्व भाग आणि ऑस्ट्रेलिया खंड यांमध्येही सामाजिक संक्रमणे होत होती.



*माया संस्कृतीतील अत्यंत बारकाव्याची रचना असलेले एक भित्तीशिल्प (स्रोत – विकीपिडिया)*

अमेरिका खंडातही शेतीवर आधारित संस्कृती होत्या. त्यांमध्येही विविध प्रकारची सामूहिक ज्ञाननिर्मिती झाली – उदा. माया

संस्कृतीतील कॅलेंडर, इंका संस्कृतीतील मोठमोठे पिरॅमिड, इ. अमेरिका खंडातील विविध संस्कृतींमधील देवाणघेवाणींमधून येथेही पितृसत्ताक व विविध स्तरांत समाज विभागला गेलेली समाजव्यवस्था उभी राहिली.

हिमयुगात आशियाच्या अगदी पूर्वेकडील भागातले आज अनेक बेटांमध्ये विभागलेले दिसणारे टापू एकमेकांशी आणि ऑस्ट्रेलिया खंडाशीही जोडलेले होते. याच कारणामुळे केवळ पायी चालत दक्षिण आशियातून आलेले लोक ह्या भागात वसले. हिमयुग संपल्यानंतर काही ठिकाणी शेतीचे प्रयत्न झाल्याच्या पाऊलखुणाही सापडल्या आहेत. पण एकदंरीतच निसर्गाने साथ न दिल्याने शेतीची संस्कृती इथे रुजली नाही. महासागरांची पातळी वाढल्यावर उर्वरित जगाशी संपर्कही तुटला. पण तरीही सामाजिक बदल होतच राहिले. हवामान व नैसर्गिक परिस्थिती जसजशी बदलत गेली तसे इथल्या माणसांना तिच्याशी जुळवून घ्यावे लागले. शिकारीतूनही उत्पादनवाढीसाठी कल्पक प्रयत्न झाले (उदा. मासेमारीसाठी नदीपात्रात पाणी अडवून तळी निर्माण करणे). अशा तंत्रांच्या वापरातून उत्पादकता वाढल्यावर लोकसंख्याही वाढली व त्यामुळे नातेसंबंधांतील गुंतागुंतही वाढली. ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या टोळयांमध्ये दरवर्षी विशिष्ट कालावधीत एका ठिकाणी एकत्र येण्याची प्रथा आहे. परस्परांचे अनुभवसिध्द ज्ञान परस्परांमध्ये वाटण्याची व व्यापारउदीमाची ही एक वार्षिक सुवर्णसंधी असते. अशा माध्यमांतून इथेही सामूहिक ज्ञाननिर्मिती होत गेली.

थोडक्यात म्हणजे ऑस्ट्रेलेशियातील माणसे आदिम भटक्यांच्या हिमयुगीन संस्कृतीतच जगत राहिली असे समजणे चुकीचे आहे. या ठिकाणीही पूर्वीच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीची रचना असलेल्या समाजव्यवस्था उभ्या राहिल्याच.

या लेखात सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे मानवाची उत्पत्ती झाल्यापासूनच्या मानवी समाजव्यवस्थेतील बदलांचा इतिहास पहाता शेती करायला सुरूवात केल्यापासून ते अत्यंत गुंतागुंतीची कृषिप्रधान समाजव्यवस्था निर्माण होण्याचे संक्रमण खूपच झपाट्याने झाले असे दिसते. पण आत्ता आपण ज्या टप्प्यावर उभे आहोत तिथून मागे पाहिले, तर यानंतरची संक्रमणे त्यापेक्षाही अधिक वेगाने झालेली दिसतात! हे कसे घडले, जगाच्या तीन भूभागांमध्ये स्वतंत्रपणे उभ्या राहिलेल्या गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थांतून आजच्या तंत्रज्ञानाधिष्ठित आणि सर्व जग कवेत घेऊ पहाणाऱ्या समाजव्यवस्थेकडे आपला प्रवास कसा झाला, ते पाहूया पुढील लेखांत.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी – बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: सामूहिक ज्ञाननिर्मिती, आफ्रो-युरेशिया, कुशाण साम्राज्य, रेशीम रस्ते, संपर्काचे जाळे, सामाजिक उतरंड, अमेरिका खंडातील कृषिप्रधान संस्कृती, ऑस्ट्रेलेशिया, पितृप्रधान समाजव्यवस्था)*

## शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***